वादी तर्फे साक्षीदार क्रं.०२

**मी शपथेवर सत्य कथन करतो की,**

नांव :— राहुल पुरूषोत्तम धांदे,

वय :— ५० वर्षे, व्यवसाय :— नोकरी, डी.वाय. मॅनेजर,
लोकमत वृत्तपत्र,

राहणार :— अकोला.

——————————

<u>सरतपास वादी तर्फे विधीज्ञ श्री आर.बी. कुळकर्णी यांचे मार्फत सुरू</u> :—

मी सन २०१० पासून लोकमत वृत्तपत्र समुहात कार्यरत असून मागील ३ वर्षा पासून मी अकोला येथे सदर वृत्तपत्र कार्यालयात कार्यरत आहे. आमचे कार्यालयाचे मुख्य व्यवस्थापक हे अलोक कुमार शर्मा हे आहेत. सदर वृत्तपत्राचे संपादक श्री रविन्द्र टाले हे आहेत. त्यांनी मला या प्रकरणात साक्ष देण्यासाठी अधिकृत केले आहे. त्याबाबतचे पत्र मी निशाणी क्रं.२९ या कागदपत्राच्या यादी सोबत अ.क्रं.२ ला दाखल केले असून त्यावर रविन्द्र टाले यांची सही आहे. ते माझे वरीष्ठ असून ते माझे कार्यालयात कार्यरत असल्यामुळे मी त्यांची सही ओळखू शकतो. सदर पत्राला **निशाणी क्रं.३१** देण्यात येते. ती दिनांक ०९.०९. २०१८ रोजीचा आमचे वृत्तपत्राने प्रसिध्द केलेला मुळ अंक आज रोजी माझेसोबत आणला आहे. त्याची पडताळणीकृत प्रत मी निशाणी क्रं.२९ या कागदपत्राच्या यादी सोबत अ.क्रं.१ ला दाखल केली आहे. त्यातील मजकूर व मुळ अंकातील मजकूर हा एकच आहे. त्यास **निशाणी क्रं.३२** देण्यात येते. निशाणी क्रं.३२ मध्ये पान क्रं.१४ वर म्हणजेच हॅलो अकोलाचे पान क्रं.४ वर असलेली ‘‘बस वाहक—चालकास मारहाण’’, ही बातमी प्रसिध्द केली असून ती मला आता दाखविण्यात आली आहे. हे म्हणणे खरे आहे की, लोकमत वृत्तपत्र हे महाराष्ट्र राज्यातील प्रथम क्रमाकांचे वाचल्या जाणारे वृत्तपत्र आहे.

**<u>उलटतपास प्रतिवादी तर्फे विधीज्ञ श्री एस.व्ही. वालसिंगे यांचेतर्फे सुरू</u> :—**

०२. हे म्हणणे खरे आहे की, आमचेकडे वृत्तसंकलन करून आलेली बातमी प्रसिध्द करण्यासाठी आली असता तिची खात्री करून व सत्यता पडताळून ती वर्तमानपत्रात प्रसिध्द केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, पत्रकार लोक हे पोलीस ठाण्यातुन बरेचदा गुन्हेगारी स्वरूपांच्या बातम्याचे संकलन करतात. हे म्हणणे खरे नाही की, लोकमत वृत्तपत्र हे महाराष्ट्र राज्यातील प्रथम क्रमाकांचे वाचल्या जाणारे वृत्तपत्र आहे, हे मी चुकीचे कथन करीत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

सा.वा.दा.ब.अ.क.के.
समक्ष/ श्रवणोत्तर स्विकृत

( एम.एस. काळे )
दिनांक ०२.०२.२०२६ सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
अकोला.

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this P. D. F. file Order are same word for word as per original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Court | :- | Shri. M.S. Kale,<br>Jt. Civil Judge, Sr. Dn., Akot. |
| Name of the Steno | :- | S. G. Jaiswal |
| Date of Order | :- | -02-2025 |
| Order Signed by P.O. on | :- | -02-2025 |
| Order uploaded on | :- | -02-2025 |